**मा.मधुकरराव चौधरी**
**शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य**
**शनिवार दि. २३ ऑक्टोबर, १९७१**

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाच्या ह्या मंगल प्रसंगी आपणा सर्वांच्या समवेत सहभागी होण्यासाठी मी आज येथे आलो. कोल्हापूरला येताना मला नेहमीच आनंद व औत्सुक्य वाटत असते. शिक्षण, कला, साहित्य, उद्योग, राजकारण व समाजकारण आदि क्षेत्रांत कोल्हापूरचे महाराष्ट्रातच नव्हे तर अखिल भारतात एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. हे लहानसेच पण निसर्गरमन्य परिसरात बसलेले व ऐतिहासिकदृष्ट्या महाराष्ट्रात आगळे स्थान असलेले शहर, जीवनाच्या अनेक आघड्यांवर अग्रभागी आहे. छत्रपती शाहू महाराजांनी ह्या शहराला आधुनिक युगातील पुरोगामी विचारांची दीक्षा दिली. त्यानी आपल्या द्रष्टेपणाने व कल्पकतेने कला, साहित्य, शिक्षण, समाजकारण आदि क्षेत्रांत नव्या नव्या योजना आखून व्यक्ती–व्यक्तींचे व सबंध समाजाचे कर्तृत्व फुलविण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच निर्माण झालेल्या अनेक थोर व्यक्ती व श्रेष्ठ परंपरा आज महाराष्ट्राच्या मानबिंदू ठरल्या आहेत. ह्या प्रसंगी प्रथम मी त्यांना अभिवादन करतो.

भारतीय इतिहासातील धृव तारा असे ज्यांचे वर्णन करता येईल अशा स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांचे नामाभिधन धारण करणाऱ्या ह्या विद्यापीठाची स्थापना म्हणजे कोल्हापूरच्या ह्या श्रेष्ठ परंपरांच्या पार्श्वभूमीत आधुनिक काळात घडून आलेला एक अपूर्व योगच म्हटला पाहिजे. ह्या परंपरांना नवे साजशृंगार चढविणारा जणू एक नवा उन्मेशच आहे. कोल्हापूरच्या उंच माळावर वसलेले हे विद्यापीठ म्हणजे ओसाड माळरानावर उमललेले एक विविधरंगी, सुगंधी पुष्पच म्हणता येईल. ''जनताभिमुख शिक्षणाचे नवे केन्द्र'' म्हणून महाराष्ट्राच्या जनमानसात त्याने स्वतःसाठी एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. ह्या विद्यापीठात शिक्षणाला नवा आशय देण्याचा प्रयत्न चालू आहे. ग्रामीण विभागाच्या प्रगतीला हातभार लावणारे संशोधन येथे चालू आहे. विद्यापीठाच्या कामाच्या कक्षा लोकशिक्षणाच्या कार्यक्रमापर्यंत व शालेय स्तरापर्यंत रुंदावल्या आहेत. समाजातील गरजांचे भान ठेवणाऱ्या ह्या विद्यापीठाला लोकपीठच म्हटले पाहिजे. त्यामुळेच मला येथील कार्याबद्दल अभिमान व आस्था वाटते. प्रारंभापासून ह्या विद्यापीठाच्या जडण–घडणीसाठी कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यासारखे अनुभवी व कुशल नेतृत्व लाभले. त्यामुळे विद्यापीठ दिवसेंदिवस प्रगतीपथावर जात आहे. आज विश्वविद्यालयीन शिक्षणासमोर जी आव्हाने किंवा समस्या उभ्या आहेत त्यात सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये आमूलाग्र परिवर्तन करणे, यासाठी अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती व

परीक्षा पद्धती यांच्यामध्ये बदल करणे, विद्यार्थी–केंद्रित परंतु समाजाभिमुख अशा शिक्षणपद्धतीची निर्मिती करणे ह्या समस्या ज्वलंत आहेत. त्या सोडविण्यासाठी आपल्या आजवरच्या परंपरांना अनुसरून आपण अग्रेसर राहाल व माननीय डॉ. आप्पासाहेब पवारांच्या समर्थ नेतृत्वाखाली यशस्वी व्हाल हीच आशा व शुभेच्छा प्रगट करतो.

पदवीधर मित्रहो, विद्याथी–जीवनातील अध्ययन व संशोधनाचा उपक्रम यशस्वी पार पाडून विविधतेन नटलेल्या समाज–जीवनाच्या विशाल प्रांगणात आता आपण पदार्पण करणार आहात, हा मोठा रोमांचकारी गंभीर क्षण आहे. विद्यार्थी–जीवनाची स्वप्नमय सृष्टी आणि नागरिक–जीवनाची वास्तव सृष्टी यांच्या सीमारेषेवर आपण उभे आहात. एकीकडे अध्ययनपूर्तीचा आनंद तर दुसरीकडे नव्या जीवनप्रवेशाविषयीची उत्सुकता अशा प्रकारच्या संधीप्रकाशाच्या वेळी असावी अशी सुखद अवस्था या वेळी आपले मन अनुभवीत असेल. अशा मनस्थितीचा अनुभव वीस वर्षांपूर्वी मीही घेतलेला आहे आणि त्यावेळी हा देखील अनुभव घेतलेला आहे की, विद्यार्थीदशेचा उंबरठा ओलांडायला मन तयार होत नाही. सारखे वाटते की, विद्यार्थी–दशेच्या या स्वप्नील सृष्टीतून बाहर पडूच नये. सहकाऱ्यांच्या आणि मित्रांच्या मायेची ऊब मनाभोवती लपेटून घ्यावी आणि तिच्यात धुंद राहावे. हास्य विनोदाच्या उर्मी चौफेर उधळाव्यात आणि नवजीवनाच्या अस्फुट आकांक्षांची रंगदार चित्रे रेखटण्यात आणखी काही काळ गुंतून राहावे. पण भविष्यकाळाची ओढही त्या क्षणी साद घालते आणि म्हणजे, ''असे ! युवावस्थेतील विद्यार्थीदशेचा चारपाच वर्षांचा मनोरम काळ चिरंतन राहावा अशी इच्छा करण्याने का तो चिरंतन राहणार आहे ? आणि समज, तसा तो राहिला तर त्या अवधीत मनोरमतेचा कंटाळा नाही का येणार ? अनुभवाचा आणि आनंदाचा देखील तोचतोपणा चाखून मन विटेल ना ! त्यापेक्षा बेधडक जीवनाच्या संघषात उडी टाक. या संघर्षामध्ये कधी सुख तर कधी दुःख असेल; कधी उत्तेजन तर कधी उपहास असेल; कधी यश तर कधी अपयश असेल. परंतु हा जीवनसंघर्षच तुझ्या प्रज्ञेला व कर्तृत्वाला आव्हान देईल, धारदार बनवील. जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत अशी उलथापलथ सातत्याने पेलत राहण्यामध्ये जी मौज आहे, जी अल्पजीवी विद्यार्थीदशेत नाही. म्हणून मोकळ्या मनाने पुढे जा. सतत पुढं जा.'' स्नातक मित्रांनो, भविष्यकाळाची ही आव्हानयुक्त हाक तुम्हालाही ऐकू येत असेलच. त्या भविष्यकाळाला सामोरे जाण्यासाठी, प्रसंगी झुंज देण्यासाठी हवे असलेले सामर्थ्य आजपर्यंतच्या आपल्या ज्ञानार्जनामधून आणि पदवीसंपादनामधून आपण प्राप्त केले असावे, म्हणूनच मी आपले अभिनंदन करतो व हे सामर्थ्य सदैव वर्धिष्णु राहावे अशी हार्दिक शुभेच्छा प्रकट करतो.

आज मी आपल्याशी वडीलकीच्या भूमिकेवरून किंवा शिक्षणक्षेत्रामधला एखादा पदाधिकारी म्हणून संवाद करणार नाही तर तो बरोबरीच्या सहाध्यायाच्या भूमिकेतून करीन. कारण वडीलपण

आणि लहानपण, जुनी पिढी आणि नवी पिढी हे वयोमानानुसार ठरविणे तर्कसंगत नाही. कोणती व्यक्ती वर्तमानकाळाच्या संदर्भात किती दूर–किती निकट आहे यावरून त्या व्यक्तीची पिढी जुनी की नवी ते ठरवायचे असते. मला आपणाशी महाविद्यालयाच्या परिसरात वावणाऱ्या प्रचंड युवाशक्तीच्या अविष्काराविषयी आज बोलावयाचे आहे. हा विषय सध्या जागतिक पातळीवर चर्चिला जात आहे; अभ्यासला जात आहे. मानवी समाजाच्या उत्क्रांतीच्या दृष्टीने तर तो आजचा ज्वलंत आणि विचारवंतांच्या जिव्हाळ्याचा विषय ठरलेला आहे. तसेच विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक, सामजिक व राजकीय उद्दिष्टांच्या पूर्तीच्या संदर्भातही त्याला फार महत्त्व प्राप्त झालेले आहे.

गेल्या पाच–सहा वर्षांती विद्यार्थी आंदोलने हा एक खोलवर अभ्यास करण्यासारखा विषय आहे. पाश्चिमात्य देशात विद्यार्थ्यांचा असंतोषाचा, अस्वस्थतेचा उद्रेक १९६७ ते १९६९ मध्ये झाला. त्यानी मीमांसा करण्याचा प्रयत्न काही समाजशास्त्रज्ञ व काही मानसशास्त्रज्ञ करीत आहेत. १९६७–६८ सुमाराला विद्यार्थी आंदोलनाची प्रचंड लाट अमेरिका व युरोपमध्ये येऊन गेली. ह्या लाटेचे पडसाद जपान आणि दक्षिण अमेरिका अशा दूरदूरच्या देशांतही उमटले. विद्यार्थ्यांच्या असंतोषाने पाश्चात्य समाज गोंधळून गेला. वास्तविक ह्या देशांत शिक्षराचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला आहे. इतकेच नव्हे तर त्यांचे जीवनमानही खूपच उंचावलेले आहे. दारिद्र्य, दास्य व दैन्य हे मानवतेचे वैरी तिथे जवळ जवळ नामशेष झालेले आहेत. असे असूनही विद्यार्थ्यांच्या असंतोषाचा उद्रेक तिथे कां व्हावा ? आणि त्याने काही वेळा हिंसक वळण कां घ्यावे ? शिक्षणाने माणसाचे व्यक्तिमत्व विचारसंपन्न व विवेकपूर्ण बनावे, बुद्धी व भावना प्रफुल्लित व विकसित व्हाव्यात, संवेदनाक्षम मन तयार व्हावे अशी आपली सामान्यतः अपेक्षा. परंतु ही अपेक्षा पूर्ण न होता नवयुवकांमध्ये असंतोष का धुमसू लागला ? विद्यार्थीजीवन व समाजजीवन यांचा विधायक सांधा कां जुळू शकला नाही ? इत्यादि अनेक प्रश्न मनासमोर उभे राहातात. वरवर पाहिले तर आंदोलनाची नेहमी सांगितली जाणारी कारणे सगळीकडे सारखीच दिसतात. उदाहरणार्थ, शिक्षणप्रसारामुळे विद्यार्थ्यांची वर्गात होणारी गर्दी, विद्यापीठांच्या व महाविद्यालयांच्या जुन्या व अपुऱ्या इमारती, जुनेच परिसर, जुने व कालबाह्य अभ्यासक्रम व अध्यापनपद्धती, परीक्षापद्धतकीत्रृत्नकीचल उणिवा, विद्यार्थ्यांकडे बघण्याचा सहानुभूतीशून्य दृष्टीकोन ही असंतोषाची काही कारणे आहेत, असे नेहमी सांगितले जाते. विद्यार्थ्यांची तक्रार अशी की, त्यांच्या अवतीभोवती समाज जे उच्चारतो ते आचरत नाही. निरनिराळे राजकीय पक्ष विद्यार्थ्यांच्या सुखदुःखाचे प्रामाणिकपणे प्रतिनिधित्व करीत नाहीत, किंबहुना विद्यार्थ्यांच्या आंदोलनात राजकारण घुसडण्याचा प्रयत्न करतात. जुन्या पिढीच्या आणि प्रस्थापित शासनाच्या वर्चस्वाला किंवा अर्कण्यतेला कंटाळून, ती असह्य वाटून विद्यार्थी आंदोलने करण्यास उद्युक्त होतात हेही एक असंतोषाचे कारण सांगितले जाते. एकीकडे शिक्षणशास्त्रज्ञ व शिक्षणवेत्ते विद्यार्थ्यांना

समाजपरिवर्तनाचे काम स्वीकारण्याचे आवाहन करतात, पण दुसरीकडे जुनाट अभ्यासक्रमांच्या व परीक्षा–पद्धतींच्या भाराखाली त्यांचा जीवनोन्मेष चिरडून टाकतात, ही तक्रारही ऐकू येते. या कारणपरंपरेच्या संदर्भात जागतिक रंगमंचावरील विद्यार्थी–आंदोलनाकडे दृष्टिक्षेप टाकला तर मात्र असे आढळते की सर्व कारणे त्या त्या आंदोलनांच्या पाठीशी आहेतच असे नाही. अमेरिकेतील बर्कले युनिव्हर्सिटीमध्ये जाण्याची संधी मला मिळाली. विद्यार्थ्यांनी त्या ठिकाणी दंगल केली त्याचे कारण त्या प्रचंड विद्यापीठाच्या जगड्व्याळ यंत्रात आपण व्यक्ती या नात्याने दुर्लक्षिले जात आहोत अशी त्यांची तक्रार होती. विद्यापीठाच्या विशाल व्याख्यानगृहात खच्चून भरलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मी केवळ एक निनावी अंक आहे –''I am only a number'' अशी व्यथा तेथील विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. बर्क्लेसारख्या इतरही मोठ्या विद्यापीठांच्या मोठेपणात हरवून जाणारी अस्मिता, अभिव्यक्तीला पारखे होणारे व्यक्तिमत्व, प्राध्यापकांच्या बौद्धिक जीवनाशी अपरिचित राहाणारे आणि माणसांच्या जवळीकीपासून वंचित होणारे विद्यार्थीजीवन अशा गोष्टींचा उबग येऊन अमेरिकेतील विद्यार्थ्यांनी आपला असंतोष प्रगट केला. पण या उलट बर्लिनमधील विद्यार्थ्यांनी फार लहान गटात आपले परिसंवाद घेतले जातात आणि त्यामुळे मोठ्या सामुदायिक जीवनातून मिळणाऱ्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ आपल्याला होत नाही म्हणून दंगल केली. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी तेथील शिक्षणपद्धतीतील अतिरेकी स्वातंत्र्याला दूषण लावले, तर फ्रँकफूर्टचे विद्यार्थी जर्मनीतल्या शिस्तबद्ध अभ्यासक्रमावर रुष्ट झाले. त्याचवेळी इटलीतील ट्यूनीस आणि नेपल्स येथील विद्यार्थ्यांनी प्राध्यापक व्याख्यानांची तयारी नीट करीत नाहीत म्हणून वर्ग बंद पाडले. कॅलिफोर्नियातील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या श्रीमंतीविषयी वाटू लागलेल्या तिरस्कारामुळे बंड उभारले तर पॅरिसच्या विद्यार्थ्यांनी मोडक्यातोडक्या घरात राहावे लागते म्हणून क्रांतीची घोषणा केली. परीक्षा फार कठीण असतात म्हणून फ्रान्समधल्या विद्यार्थ्यांनी दंगा केला तर टोकियोतील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश मिळविणे कठीण असले तरी त्यानंतरच्या परीक्षा सोप्या असतात म्हणून आंदोलन केले. असंतोषाची आणि विद्रोहाची विविध कारणे किती परस्परविरोधी आहेत ते यावरून लक्षात येईल.

या आंदोलनाकडे थोडे बारकाईने पाहिल्यास काही महत्वाच्या गोष्टी आपल्या सहज निदर्शनास येतात. औद्योगिक व आर्थिक दृष्ट्या संपन्न असलेल्या देशात विद्यार्थी–विद्रोहाचा स्फोटअधिक प्रमाणात झालेला दिसतो. विद्यार्थ्यांचा दैनंदिन जीवनक्रम जेथे सामान्यतः अधिक सुखाचा आहे तेथेच विद्रोह देखील अधिक आहे, तसेच जेथे शिक्षणाचा प्रसार सार्वत्रिक झालेला आहे तेथे विद्यार्थी–आंदोलनात भाग घेण्याची प्रवृत्ती अधिक आढळते. परंतु ह्या सर्व आंदोलनांमध्ये एकच महत्त्वाचे साम्य दिसते ते म्हणजे 'संघटित युवाशक्तीचे' विस्मयकारक दर्शन. आत्मप्रगटीकरणासाठी व अभिव्यक्तीसाठी अधीर झालेली संघटित युवाशक्ती हीच सर्व देशांत सर्व विद्यार्थी आंदोलनांच्या

मुळाशी असलेली दिसते. शिषक्षणप्रसाराने जागृत झालेली ही अमर्याद युवाशक्ती, तिच्या अनिरुद्ध प्रवाहाच्या आड येणाऱ्या कोणत्याही भौतिक वा मानसिक बंधनांना न जुमानता अभिव्यक्तीच्या अनेक वाटा जणू शोधीत आहे. या प्रेरणेस, तिने कार्यप्रवण झालेल्या शक्तीस व निर्माण केलेल्या जिद्दीस नेहमी योग्य वळण मिळतेच असे नाही. विवेक–विचारांच्या आधारे व निश्चित ध्येयाच्या दिशेने ही शक्ती कामी लागली तर समाजाचा कायापालट होऊ शकतो. संस्कृतीची प्रगती होते. या उलट ती विकारांच्या आधाराने ध्येयविरहित व अनिर्बंध संचार करू लागली तर समाजहितास घातक ठरते.

ध्येयवासाला आणि जिद्दीला तेव्हा दिशा लाभते, तेव्हा व्यक्तीच्या तसेच समाजाच्या विकासाच्या मार्गातील अनेक अडचणी धुक्यासारख्या विरू लागतात. याचा अनुभव विविध देशांतील युवकसेवा कार्यक्रमांतून आलेला आहे. आंतरराष्ट्रीय सेवा संघटनांचे कार्य या बाबतीत उल्लेखनीय आहे. युवकशक्तीचा विधायक प्रत्यय जर्मन, इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स यांच्यासारख्या प्रगत देशांत दुसऱ्या महायुद्धानंतर आला. तेथील विद्यार्थ्यांनी युद्धामुळे विस्कटलेली आपल्या राष्ट्राची घडी बसवण्यात फार मोठा वाटा उचलला. आजही या राष्ट्रातील सुशिक्षित युवक हजारो मैलांचा प्रवास करून दूर दूर देशी जाऊन अविकसित समाजाच्या पुनरुत्थानाला साह्य करीत असल्याचे चित्र आपण पाहातो. या प्रगत राष्ट्रांप्रमाणेच विकसनशील राष्ट्रातही असाच प्रत्यय आपणास येत आहे. इराण, इथोपिया, इंडोनेशिया, इस्त्रायल यासारख्या विकसनशील देशातील विद्यार्थी ग्रामीण भागाच्या कान्याकोपऱ्यात जाऊन लोकजीवनातील अज्ञान, अनारोग्य व अहितकारक रूढी–परंपरा यांचे निराकरण करण्याच्या प्रयत्नात आज दंग झालेले दिसत आहेत. तेव्हा एकीकडे विद्यार्थी असंतोषाची व विद्रोहाची मीमांसा करीत असताना युवकशक्तीच्या या विधायक कर्तृत्वाचे मर्महही समजून घेतले पाहिजे. बर्लिन विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या बंडाचा अभ्यास करीत असताना ज्या जर्मन विद्यार्थ्यांनी आपल्या बेचिराख झालेल्या देशात सर्व शाळागृहे स्वतःच्या कष्टाने बांधून काढली, त्यांच्या भावना व प्रेरणा या देखील समजून घेण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थी आंदोलनाची कारणमीमांसा यामुळे स्पष्ट होऊ शकेल व संभ्रमात सापडलेल्या युवाशक्तीला नव्या योग्य वाटा सापडतील आणि तिच्या बंडखोर अविष्कारामुळे गोंधळलेल्या समाजास विद्यार्थ्यांसंबंधीची आपली जबाबदारी कशा रीतीने पार पाडावी या संबंधीचे मार्गदर्शन घडू शकेल.

आपल्याकडील विद्यार्थ्यांचे आंदोलन देखील कधी विद्यापीठ सुधारषची मागणी करते तर कधी सामाजिक व राजकीय अन्यायाच्या निराकरणासाठी आग्रह धरते. क्वचित प्रसंगी सामाजिक नितिमत्ता सुरक्षित ठेवण्याची तळमळ या आंदोलनात दिसून येते. ही आंदोलने कधी सामग्रीच्या अभावातून तर कधी व्याख्यानबाजीच्या कंटाळ्यामुळे उद्‌भवतात. काही प्रसंगी राजकीय पक्ष विद्यार्थ्यांना वेठीस

धरून राबविताना व त्यांची आंदोलने उभारताना दिसतात. कधी फी कमी करा, परीक्षा सोपी करा, पास होण्यासाठी ठेवलेले गुण कमी करा असल्या कारणांवरून ही आंदोलने संघटित होताना दिसतात, तर कधी अभ्यासक्रम व पदव्या यांचा संदर्भ जीवनाशी न जुळल्यामुळे निर्माण होणाऱ्या वैफल्याच्या पोटी ती जन्मतात. अभ्यासक्रम चांगले असावेत, जीवनाशी सुसंवादी असावेत, प्राध्यापकांनी उत्कटतेने व आत्मीयतेने अध्यापन करावे, विद्यार्थ्यांशी त्यांचे बंधुत्वाचे संबंध असावेत, विद्यापीठाचा कारभार स्वच्छ असावा आणि त्याचे व्यवस्थापन कार्यक्षम असावे या व अशा प्रकारच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मागण्या केव्हाही रास्तच आहेत. शिक्षणक्षेत्रातील अन्याय व व्यथा नष्ट करण्यासाठी झालेला हा युवाशक्तीचा अविष्कार पाहून मन थक्क होऊन जाते. शिक्षण क्षेत्राचे पावित्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी व कार्यक्षमता टिकविण्यासाठी या गोष्टींकडे समाजाचे लक्ष वेधण्याचे काम केवळ महाविद्यालयीन युवकांनी नाही तर समाजातील सर्व सुजाण व्यक्तींनी सातत्याने केले पाहिजे. परंतु महाविद्यालयाच्या आणि विद्यापीठाच्या क्षेत्राबाहेर देखील जे दैन्य व दारिद्र्य आहे, जी विषमता आहे व जे अन्याय आहेत त्यांचे निराकरण करण्यासाठी देखील या युवाशक्तीनेच सज्ज झाले पाहिजे.

समाजाच्या दुःखाशी समरस होण्याची ओढ तरुण मनाला मानवी संस्कृतीच्या आरंभापासून लागलेली आहे. उपेक्षितांचे लढे तरुणांनी लढायचे हा जणू निसर्गाचा नियम आहे. जे शोषित आहेत, वंचित आहेत; ज्यांना अन्यायाचे, गुलामगिरीचे जहर पिऊन दिवस कंठावे लागतात अशा उपेक्षितांच्या प्रेमातून, त्यांच्या दुःखाविषयीच्या सहानुभूतीतून निर्माण होणारा युवकांचा लढा अव्याहत चालू राहिला तरच मानवी संस्कृतीची पातळी सातत्याने उंचावत राहील, मानवी स्वातंत्र्याची आणि समतेची ग्वाही त्यातूनच मिळेल. हे मुळीच घडत नाही असे माझे म्हणणे नाही. पण जे घडू लागले आहे त्याचे प्रमाण वाढले पाहिजे. या उपक्रमाच्या संदर्भात उत्साहाला तर उधाण आले पाहिजे असे मला वाटते. यासाठी विद्यार्थ्यांमधील या युवाशक्तीला विधायक कर्तृत्वाचे विशाल क्षेत्र निर्माण करून देण्याची जबाबदारी सर्व वडीलधाऱ्यांची आहे, विशेषतः विद्यापीठ व महाविद्यालयातील नेतृत्वाची आहे. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या नेत्यांचीही आहे. शिक्षणातून निर्माण होणारे हे सामर्थ्य दिशाहीन राहाते की ध्येयशील बनते, विचाराचे अधिष्ठान मिळून विधायक कृतीत परिणत होते की विकारांच्या अधीन होऊन विघातक चळवळीत पर्यवसित होते या गोष्टींची दखल सर्वांनीच घेतली पाहिजे. युवकांच्या समस्या सोडविण्याची जबाबदारी केवळ महाविद्यालये व विद्यापीठे यांची नसून सामाजिक व राजकीय नेत्यांची आणि शासनाची अशी सर्वांची सामूहिक आहे असे मानले पाहिजे.

सुशिक्षित युवाशक्तीमध्ये समाजाचा कायापालट करण्याचे विधायक सामर्थ्य किती प्रचंड प्रमाणात आहे याचा प्रत्यय प्रौढ जगाला अद्याप कां आला नाही ही माझ्या दृष्टीने चिंतेची व चिंतनाची बाब आहे. या शक्तीचा विनियोग दिशाहीन उद्रेकासाठी होऊ न देता शैक्षणिक परिवर्तनासाठी करून

घेतला पाहिजे. शैक्षणिक परिवर्तनासाठी योजिलेली शक्ती पर्यायाने समाजपरिवर्तनाच्या कामी लागते हे खरे, परंतु पर्यायानेच नव्हे तर प्रत्यक्षपणे देखील ही युवाशक्ती समाजपरिवर्तनाचे कार्य करू शकते असे मला वाटते. महाविद्यालयीन शिक्षण जीवनाशी सुसंवादी राखण्यासाठी व त्याच्या गतिमानतेची जोपासना करण्यासाठी विचारवंत युवकांचे दृष्टिकोन निश्चित उपयोगी पडतील. त्यासाठी नवयुवकांना महाविद्यालये व विद्यापीठ यांच्या कारभारात सहभागी करून घेणे आवश्यक आहे हा विचार अलिकडे काही प्रमाणघात अमोएन्यता पावू लागला आहे. हा नवा विचार शैक्षणिक व सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेस पोषक होण्यासाठी त्या क्षेत्रातील नेते व कार्यकर्ते यांनी सहिष्णु असण्याची फार आवश्यकता आहे. याबाबतीत विद्यार्थ्यांची तर फारच मोठी जबाबदारी आहे. त्यांनी कर्तृत्वाच्या नव्या नव्या वाटांचा शेध स्वतःच घ्यावयाचा आहे. विद्यार्थीदशा ही जीवन म्हणजे काय याचे चिकित्सक संशोधन करण्याची संधी. जीवनातील उणीवा कोणत्या आहेत, दुःख, दैन्य व अकर्मण्यता कां निर्माण होतात, फुटीर वृत्ती कोणत्या कारणामुळे प्रबल होतात, उपेक्षितांचे अंतरंग समाजातील हितसंबंधीयांना स्पष्टपणे कसे समजाऊन देता येईल, समाजात प्रसन्नता कशी निर्माण होईल या विषयीचे विचार करण्याचे ठिकाण म्हणजे महाविद्यालय. आणि विचार, मनन व आचार करण्याचा काळ म्हणजे युवावस्था असे मी मानतो. याच भूमिकेतून युवक विचार करणार असतील तर त्यांचा विद्यापीठ वा महाविद्यालय यांच्या कार्यवाहीतील सहभाग अधिक प्रभावी ठरेल, किंबहुना मार्गदर्शक ठरेल. आनंदाची गोष्ट ही की, या संबंधीच्या जाणीवा महाराष्ट्रातील युवकांमध्ये निर्माण होत असताना दिसत आहेत. 'दुभंगली ही घरा, तरीपण अभंग अमुची मने । सहकार्याने कणाकणातून उभवू नवजीवने' या निश्चयाचे कोयनेच्या परिसरात भूकंपाने उध्वस्त झालेल्या शागृहांची उभारणी करणारे शेकडो महाविद्यालयीन विद्यार्थी, चन्द्रपूरच्या जंगलातील श्री. बाबा आमटे यांच्या श्रमछावणीत जिद्दीने श्रमसंस्कार घेणारे शेकडो नवयुवक, शिवाजी विद्यापीठाच्या ह्याच परिसरात स्वतःच्या श्रमाने वसतीगृहाची बाजू उभारणारे विद्यार्थी, श्रीरामपूरमधील दारूची धुंदी उतरविण्यासाठी कटिबद्ध झालेले कॉलेज युवक, बांगला देशाच्या निर्वासितांच्या सेवेसाठी व अन्य काही लहानमोठे उपक्रम हाती घेण्यासाठी उत्सुक असलेले तरुण पाहिले की महाराष्ट्रातील युवाशक्तीला नवांकुर फुटू लागले आहेत असे म्हणावेसे वाटते. हा खरा युवाशक्तीचा विधायक आविष्कार !

युवा–शक्तीच्या विधायक आणि विघातक अशा परस्पर विरोधी अविष्काराचे दर्शन असे विस्मित करणारे आहे, तसेच ते आपण सर्वांना आव्हान देणारे असे आहे. एकाच शिवशक्तीचे उग्र–मंगल असे हे रूप आहे. त्याकडे आपण कधी विस्मयाने तर कदी भयाने पाहातो व किर्तव्यमूढतेने अकर्मण्यता स्वीकारतो. कधी कधी संकुचित स्वार्थबुद्धीने त्यातील मांगल्याकडे मुद्दाम डोळेझाक करून उग्रतेला जागृत करतो आणि व्यापक हिताचा बळी घेता घेता स्वतः बळी होतो; तर कधी

लाचारीमुळे प्रवाहपतिताप्रमाणे उग्र रूपास शरण जातो. आपण एकटे यास जबाबदार नाही या सोईस्कर समजुतीने या प्रश्नास आपण बगल देतो व कदी विद्यार्थ्यांवर, कधी सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांवर, कधी विद्यापीठावर तर कधी शासनावर दोषारोप करून अलिप्त राहाण्याचा प्रयत्न करतो आणि परिणामी आंदोलनाचे स्वरूप उग्रतर व उग्रतम होण्यास अभाविकपणे मदत करतो. परंतु अशाने हा प्रश्न सुटण्यासारखा नाही. खोटे समाधान फार तर या भूमिकेमुळे मिळू शकेल. युवक–आंदोलनाची ही समस्या जर जुन्या–नव्या पिढीच्या प्रामाणिक विचार संघर्षातून निर्माण झाली असती तिचे स्वरूप असे परस्परविरोधी कदाचित् झाले नसते व ती सोडवणे एवढे गुंतागुंतीचे वाटले नसते. परंतु ही समस्या एका बाजूस नवजीवन व नवनिर्मिती यांच्यासाठी उत्कटतेने अविष्कृत झालेल्या युवकांच्या अस्मितेची प्रेरणा व त्यातून निर्माण होणारा युवा–शक्तीचा आवेग यांना समजून घेण्यात आलेली जुन्या पिढीची असमर्थता आणि दुसऱ्या बाजूस पुष्कळदा केवळ नावीन्याच्या हव्यासामुळे इष्टानिष्ट विवेक न करता जुन्या परंपरांबाबत केवळ उदासीन राहण्याची नव्हे तर अधिक्षेप करण्याची नव्या पिढीची वृत्ती यांच्या परस्परविरोधातून निर्माण झालेला आहे. अशा परिस्थितीत या दोन्ही पिढ्यांना सांधण्याचे कार्य पूर्वग्रह कायम ठेवून, अतिरेकी आचरण करून अथवा वास्तवाकडे डोळेझाक करून होऊ शकणार नाही. हे पार्य युवावस्था व गृहस्थाश्रम यांच्या संधीरेषेवर असलेली आपल्यासारखी मंडळी करू शकेल. युवा–शक्तीच्या विराट रुपास अत्यंत धैर्याने, विद्यार्थ्यांविषयीच्या विचारपूर्वक सहानुभूतीने व समाजाविषयीच्या कर्तव्यभावनेने सामोरे जाण्यानेच ही समस्या सुटू शकेल. ही उग्रता मंगलात पर्यवसित होऊ शकेल.

हे घडावे कसे ? केवळ वैचारिक आणि भावनिक पातळीवर हे होऊन चालणार नाही. विद्यार्थ्यांच्या संबंधीची सहानुभूती प्रत्यक्ष कृतीत उतरणे आवश्यक आहे. शिक्षणाची प्रक्रिया ही केवळ एकपक्षी व्यवहार नाही. अध्यापक व विद्यार्थी यांचा परस्परांना प्रतिसाद हवा असतो. त्यांचा सहभाग व सहयोग हवा असतो. उपनिषदात 'अधीत' तेजस्वी होण्यासाठी 'सहवीर्यम् करवावहै'' व ''मा विद्विषावहै'' हे दोन संकल्प अत्यंत आवश्यक मानले आहेत. कशाचे अध्ययन व्हावे, कसे अध्ययन व्हावे, हे अध्यापक–विद्यार्थी यांनी परस्पर विचाराने ठरविले पाहिजे. अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, मूल्यमापन, संस्थासंचालन आदि सर्व बाबतीत ज्याला शिकायचे त्याचे विचार महत्त्वाचे मानले जावेत. निदान महाविद्यालये व विद्यापीठ यातील युवक विद्यार्थ्यांच्या बाबतीत तरी हा सहयोग दुर्लक्षिण्यासारखा नाही. युवकांसंबंधीच्या सद्भावनेतून त्यांचा सहयोग प्राप्त करून घेतल्यास शैक्षणिक परिवर्तनही घडू शकेल व समाज परिवर्तनास ते प्रेरक ठरू शकेल.

युवकांच्या बाजूने देखील हे एक आव्हानच आहे. केवळ नावीन्याच्या हव्यासाने परंपरांचा नाश न करता भविष्याच्या संदर्भात वर्तमान काळाचा विचार त्यांना करावा लागेल. स्वतःसाठी हवे ते

उपलब्ध करून घेताना समाजाला काय हवे ते देण्याची जाणीव त्यांना ठेवावी लागेल. घेताना देण्याची जाणीव ठेवावी लागेल, मते मांडतांना मते ऐकून घ्यावी लागतील. समाजाच्या संपत्तीचा उपभोग घेत असतांना ती निर्माण करण्याचाही प्रयत्न करावा लागेल. विषमता, दोरिद्र्य, अन्याय यांच्याबद्दलची केवळ चीड बाळगून चालणार नाही तर त्यांचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न करावा लागेल. अन्यायाविरूद्ध झगडताना आपल्याकडूनही अन्याय घडणार नाही याची जाणीव ठेवावी लागेल. अन्यथा हा सहयोग ठरणार नाही. सहयोगाबरोबरच ही सर्व आव्हाने येतात. आव्हान स्वीकारणे व बदल घडवून आणणे हा तारुण्याचा धर्मच आहे. हा तारुण्याचा धर्म स्वीकारलेले अनेक युवक या महाराष्ट्रात माझ्या बघण्यात आले. त्यांचे तेजस्वी विचार ऐकले आणि जीवनातील आव्हाने स्वीकारण्याची जिद्द पाहिली. अशाच एका महाविद्यालयीन युवकाने कोयनेच्या भूकंपग्रस्त भागात काम करीत असताना उच्चारलेले शब्द अद्यापही माझ्या कानात घुमत आहेत. तो म्हणाला होता, ''इतर राज्यातील विद्यार्थी हात उगारत आहेत–मोडतोड करण्यासाठी. आम्ही हात उभारत आहोत – उद्ध्वस्त झालेल्या शाळांच्या नवनिर्माणासाठी.''

नवजीवनाचा व नवराष्ट्राच्या निर्मितीचा केवढा जिवंत असा हा उद्‌गार आहे ! अभिमानाने अंतःकरण भरून यावे, राष्ट्राच्या नवनिर्मितीच्या आशा मनात प्रफुल्लित व्हाव्यात असा हा विचार आहे. संकटग्रस्त दलितांचा व उपेक्षितांचा आक्रोश ऐकून जेव्हा त्यांच्या साहाय्यासाठी युवाशक्ती धावून जाते, तेव्हा नव्या युगाच्या निर्मितीची साक्ष किती उत्कटतेने पटते याचे प्रतिकात्मक असे हे उदाहरण आहे. असे दृश्य पुनःपुन्हा दिसावे, सर्वत्र दिसावे. विद्यार्थ्यांनी उभ्या केलेल्या समाजसेवेच्या व नवराष्ट्रनिर्मितीच्या आंदोलनाद्वारे या सुप्त शक्तीचा विधायक अविष्कार कसा होत राहील या प्रश्नाचे उत्तर विद्यार्थी, शिक्षक, अध्यापक, प्रशासक, सामाजिक व राजकीय नेतृत्व यांनी एकत्र येऊन शोधावयाचे आहे.

पदवीधर मित्रांनो, आपण ते शोधण्यासाठी मदत कराल का ? आपले उत्तर होकारार्थीच असेल अशी मी आशा बाळगतो. आपले भावी जीवन सुखाचे होवो व जीवनात आव्हानांना सामोरे जाण्याचे सामर्थ्य आपणस लाभून परिपूर्तीचे समाधान देखील मिळो हीच आपल्यासाठी या दिवसाची शुभेच्छा.

जयहिंद !

❑❑❑